# रक्ताचा पाऊस

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B269

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**रक्ताचा पाऊस : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

## अनुक्रमणिका

रक्ताचा पाऊस / ५
युद्धातील मोहरा / ७३
घोड्यांची शर्यत / १३३

# रक्ताचा पाऊस

# १

मुघताघ नदीच्या पूर्वेला असलेले ते छोटेसे ठाणे. केवळ सोळा सैनिक त्या ठाण्यावर होते. अधील पास तिथून साधारण आठ ते नऊ मैलावर होते. आणि या दोहोच्याहीमध्ये आणखीन एक ठाणे वसलेले होते.

सीमेवर पांगलेल्या सैनिकांना रसद पुरवण्याचे काम या ठाण्यांना करावे लागत असे.

दुसरे ठाणे होते अधील पासच्या पश्चिमेला साधारण चार मैलांवर... बर्फाने भरलेल्या प्रदेशात. सभोवताली नजर फेकावी तर पांढऱ्या शुभ्र बर्फाशिवाय काहीही दिसणार नाही अशा भागात.

वेळ होती मध्यरात्रीची. सर्वत्र नेहमीचीच सामसूम आणि शांतता. जागे होते केवळ दोन शिपाई... पण तेही पेंगत असलेले.

कारण सर्वजण थकले होते. अधील पासपर्यंत रपेट केल्यामुळे सर्वांची अवस्था चमत्कारिक झाली होती... केव्हा एकदा डोळे मिटतो असे त्यांना झाले होते पण ते झोपू शकत नव्हते.

कारण रात्रीच्या पहाऱ्याचे काम त्यांच्यावर होते.

एकाएकी कोणतीही पूर्वसूचना नसताना पावसाला सुरुवात झाली. दोघेही भिजलेल्या अवस्थेत आपापल्या टेंटमध्ये शिरले. पावसाचे पाणी चिकट वाटत होते... संपूर्ण शरीर झाकलेलं असल्यामुळे तोंडावर झालेला पाण्याचा शिडकाव त्यांनी टॉवेलनी पुसून काढला.

आणि दुसऱ्या दिवशीच सकाळीच सर्वजण धक्का बसलेल्या अवस्थेत त्यांच्याकडे पाहतच राहिले. दोघेही अगदी रक्ताने माखलेले होते. ठाण्याच्या सभोवताली हाडामासांचे तुकडे पडलेले होते. आणि संपूर्ण टेंटवरदेखील रक्त भरले होते.

रात्री पडलेल्या रक्ताचा पावसाचा तो प्रताप होता. रक्ताच्या पावसाबरोबर गारांसारखे हाडामासांचे गोळेही पडले होते.

सारेजण घाबरले. हा प्रकार त्यांना अगदी नवीन होता. यापूर्वी कधी रक्ताचा पाऊस पडलेला त्यांना माहीत नव्हता आणि त्यांनी कधी ते ऐकलेही नव्हते.

ताबडतोब वायरलेसवरून हेडक्वार्टरकडे संपर्क साधण्यात आला. लागोपाठ दोन हेलिकॉप्टर्स भरभरत त्या ठिकाणी येऊन पोचली. दोरांच्या शिडीवरून चार अधिकारी आणि चार हत्यारबंद शिपाई खाली उतरले.

आजूबाजूच्या प्रदेशाची हेलिकॉप्टरने पहाणी केली. हेलीकॉप्टरला उतरायला त्या ठिकाणी जागा नव्हती. हेलिकॉप्टर त्याठिकाणी कितीही गरज असली तरी उतरायला असमर्थ होते.

आलले कर्नल इस्माईल गडबडले. त्यांना त्या रक्ताच्या पावसाचा अर्थ काढता आला नाही.

नमुन्यासाठी त्यांने मासांचे तुकडे गोळा केले. त्यात छिन्नविछिन्न झालेला उजवा पायदेखील होता. माणसाच्या शरीराचेच ते तुकडे आहेत हे स्पष्ट होत होते.

ठराविक वेळ होताच पुन्हा हेलिकॉप्टर खाली आले. कर्नल इस्माईल आणि मेजर सारंग जसे खाली उतरले तसेच आपली माणसे घेऊन हेलिकॉप्टरमध्ये शिरले. दोन्ही हेलिकॉप्टर्स भरभरत निघून गेली.

संपूर्ण हेडक्वार्टरमध्ये ते हाडामासांचे तुकडे पाहून एकच घबराट उडून गेली. सारे घाबरून गेले.

आणि त्याचवेळी हेडक्वार्टरशी संपर्क साधला गेला. संपर्क साधणारी कोड शब्द सांगू शकत नव्हती. पण ती व्यक्ती आपल्या कँपचे मात्र नाव सांगत होती. कदाचित दुश्मनांचाच हा खेळ असावा असेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत होते.



ताबडतोब सकाळसारखेच दोन हेलिकॉप्टरर्स जिथून संपर्क साधण्यात आला होता. त्या ठाण्यावर आले... एकूण सहा टेंट त्याठिकाणी उभारण्यात आले होते. पण तळावर कुणाचीही हालचाल दिसत नव्हती.

खाली उतरावे की उतरू नये याच संभ्रमात कर्नल इस्माईल त्या तळावर घिरट्या घालीत राहिले. खाली उतरण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. हेलिकॉप्टर आणखीन खाली न्यायलादेखील ते राजी झाले नाहीत.

कारण, मशीनगनचा मारा झाला तर आपले स्वतःचे हेलीकॉप्टर वाचविणे कठीण आहे याची खात्री इस्माइलांना होती.

शेवटी दुसऱ्या हेलिकॉप्टरच्या पायलटने खाली उतरण्याची इच्छा प्रदर्शित केली.

पण कर्नल इस्माईल एकदम त्याला परवानगी देऊ शकले नाही. पायलट व्यतिरिक्त एक मेजर, एक कॅप्टन आणि दोन हत्यारबंद शिपाई त्या हेलिकॉप्टरमध्ये होते. शिवाय, हेलिकॉप्टर हातचे घालवायला त्यांची तयारी नव्हती.

शेवटी त्या तळापासून दूरवर मेजर सारंग उतरले. त्यांच्याबरोबर दोन शिपाईदेखील खाली आले. हेलिकॉप्टर्स त्या तळाभोवती फिरत राहिले.

जवळजवळ वीस मिनिटांची पायपीट करीत मेजर सारंग दोन्ही शिपायांसह सावधगिरी बाळगीत आले. त्यावेळी कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची तयारी त्यांनी ठेवली होती... अचानक गोळीबार होईल किंवा हँडग्रेनेड फेकला जाईल अशी शंका त्यांना वाटत होती. पण भीतीचा लवलेशही त्यांच्या मनाला शिवला नव्हता.

टेंट असलेल्या हद्दीत जेव्हा ते आले... एका टेंटच्या पडद्यापाशी जेव्हा ते येऊन पोचले तेव्हा खाली पडलेली एक स्टेनगन त्यांना दिसली. त्या स्टेनगनमध्ये पूर्णपणे भरलेले मॅगझीन होते.

त्यांची सावधगिरी आणखीनच वाढली गेली. काहीतरी धोका आहे याची खात्री मेजर सारंगना झाली. संपूर्ण तळावर सामसूम होती. इतकी भयाण शांतता त्या तळावर असणे शक्य नव्हते. आपले शिपाई असते तर हेलिकॉप्टरच्या आवाज ऐकून ते निश्चित बाहेर आले असते... ते नाहीत त्याचाच अर्थ काहीतरी धोका आहे याची खात्री सारंगना पटली होती.

'साब, मी आत जाऊन पाहू?' एका शिपायाने हलक्या आवाजात मेजर सारंगना विचारले. आणि त्याचवेळी कण्हण्याचा आवाज बाहेर फुटला. मेजर सारंग काय सांगतात हे ऐकायलादेखील तो शिपाई थांबला नाही.

जवळजवळ बारा वर्षांचा त्याच भागातील अनुभव त्या शिपायाला आला होता. काहीही घडले तरी त्याला आश्चर्य वाटण्यासारखे नव्हते. सरहद्दीपासून चौदा किलोमीटर आत असलेल्या त्या ठाण्यावर दुश्मनांचा हल्ला झाला नसेल हे मानायला त्याची तयारी नव्हती.

खाली पडलेली स्टेनगन चांगल्या स्थितीत आहे याची खात्री करून तो निघाला. तो छोटा तंबू पूर्णपणे रिकामा होता. तोपर्यंत दुसऱ्या शिपायाने बाजूच्या टेंटमध्ये प्रवेश केला होता. पण तिथेही कुणी नव्हते.

मधल्या टेंटमध्ये मात्र एक शिपाई पडला होता... ऑपरेटरचा तो सहायक होता. त्याची अवस्था अतिशय वाईट झाली होती. त्याच्या पोटाखालचा भाग रक्ताने माखला होता. चार पाच गोळ्या त्याच्या पायात आणि कंबरेत शिरलेल्या होत्या.

शांतपणे त्याने मेजर सारंगकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर झळकलेले समाधान मेजर सारंगच्या नजरेतून सुटले नाही. अकरा शिपायातील तो त्या तळावर सापडला होता.

टेंटबाहेर आलेल्या मेजर सारंगने दोन्ही हेलिकॉप्टरना खाली येण्याचा इशारा केला. चार दोऱ्यावर लटकणारी एक खुर्ची मेजर सारंगनी खूण करताच खाली सोडण्यात आली. जखमी शिपायाला उचलून बाहेर आणले जाताच त्या खुणेचा अर्थ ओळखला गेला होता.

जखमी शिपायाला घेऊन दोन्ही हेलिकॉप्टरर्स हेडक्वार्टरकडे आले. डॉक्टरांचे उपचार सुरू झाले. तो जगेल पण त्याचे दोन्ही पाय निकामी होतील असेच डॉक्टरांचे मत होते.

पण मेजर सारंगना काय घडले हे ऐकून घ्यायचे होते.... जे घडले ते अतिशय भयंकर होते. त्या शिपायाला आपण जे घडले ते केव्हा एकदा सांगतो असे झाले होते.

✦✦✦



अकरा माणसांच्या त्या तळावर तीन शिपाई रात्रीचा पहारा करीत होते. सरहद्दीपासून जवळच असलेल्या ठाण्यांवरील शिपायांना रात्रीचा अगर दिवसाचादेखील पहारा करावा लागत होता.

त्या रात्रीचा अंधार... आणि त्यातून सभोवार पसरलेले धुके. पहारेकऱ्याच्या मनात कोणताही संशय निर्माण करून गेले नाही. कारण, हे सारे नेहमीचेच होते. घाबरण्याचे त्यांना कोणतेही कारण नव्हते. अशा अनेक रात्री निघून गेल्या होत्या.

उत्तरेकडच्या बाजूस असलेल्या पहारेकऱ्याला काय घडले ते समजले नाही. शक्तिमान पंजात तोंड दाबले गेले हे लक्षात येण्यापूर्वीच छातीत काहीतरी खसकन् खुपसले याची जाणीव झाली. तो शिपाई कोणतीही हालचाल करू शकला नाही.

उरलेल्या दोन्ही शिपायांची नेमकी तीच गत झाली. तिसऱ्या शिपायाने ठोकलेली आरोळी तितकीशी स्पष्ट नसली तरी दोन चार शिपायांना जागे करून गेली.

पाहता पाहता तळ जागा झाला. ठाण्याचा प्रमुख असलेल्या हवालदाराने पहारेकऱ्यांना हाका मारून पाहिल्या. पण जवाब मिळाला नाही.

पण सारे ठाणे शांत होण्यापूर्वीच थोडीशी खळबळ माजून गेली. गोळ्यांचा पाऊस अचानक सुरू झाला. लान्स नाईक बहादूर टेंटखालून लपत छपत कसाबसा धुमसचकरीपासून दूर झाला तेव्हा तो दोन्ही पायांचा उपयोग करू शकत नव्हता. त्याची स्टेनगन टेंटबाहेरच कुठेतरी पडली होती. शक्यतो दूर जाण्याचा प्रयत्न तो करीत होता. मोठमोठ्याने बोलण्याचे आवाज त्याच्या कानात शिरत होते.

हळूहळू आवाज कमी कमी होत नाहीसे झाले. अस्पष्टसे उजाडले पण धुके कमी झाले नव्हते. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. पण तळाच्या हद्दीत येण्याचे धैर्य बहादूरला होत नव्हते. आपली शुद्ध हरपली केव्हा हे देखील त्याच्या लक्षात आले नव्हते.

दुश्मनांचा हमला झालेला आहे हे सत्य जाग आल्यानंतर त्याला समजले. कंबरेत आणि पायात होणाऱ्या वेदना त्याला असह्य होत होत्या. शेवटी त्यांने सरपटत सरपटत गोगलगायी सारखे तळाच्या रोखाने यायला सुरुवात केली त्यावेळी धुके अगदीच कमी झाले होते. पण ऊन काही खाली पडत नव्हते.

दबकत दबकत तो कसाबसा आपल्या टेंटपाशी आला. बाहेर पडलेली एक रायफल त्याने उचलली. ती आपली नाही हे त्यांच्या लक्षात आले. पण ती रायफल कोणती आहे हे पाहायला त्याला भान नव्हते.

कुणाचीही जाग नव्हती. रात्रीच्या धुमचक्रीत सारेजण ठार झाले असावेत हाच विचार त्याच्या मनात घोळत होता.

आपल्या टेंटमधून बाहेर पडला. वेदनांनी विव्हळत होता. शक्ती क्षीण झाल्यासारखी वाटत होती. पण अद्याप आपले काम संपले नाही असेही त्याला वाटत होते. आपण मरणार आहे... मरण्यापूर्वी हेडक्वार्टरला कळवावे हा विचार त्याच्या मनात घर करून राहिला होता.

हेडक्वार्टरशी तो संपर्क साधू शकत होता. पण त्याला कोड शब्द माहीत नव्हते. पण त्यामुळे फारसे काही बिघडणार नव्हते.

कसाबसा आपल्या टेंटमधून बाहेर पडलेला बहादूर मधोमध असलेल्या टेंटमध्ये आला. आपल्या हातातील ताकद नाहीशी तर झाली नाही ना हाच संभ्रम त्याच्या मनात निर्माण झाला. कारण दीड दिवस तो बर्फात पडून होता. दोन्ही हात छातीकडे घेऊन तो पडला होता.

कशाबशा त्याने वायरलेस सेटचा दोन केबल्स बॅटरीला जोडल्या. वायरलेस सेट ऑन केला. की थेट हेडक्वार्टरशी संबंध जोडला जातो हे त्याला माहीत होते. हेडगियर कानाला लावून त्याने 'हॅलो' असा आवाज काढायला सुरुवात केली. जवळजवळ दोन मिनिटे जेव्हा कोणताही प्रतिसाद मिळाला नाही तेव्हा हळूहळू त्याने स्टेशन हलवायला सुरुवात केली... तोंडातून हवा सारखी निघत राहिली.

कँपकॉटवर पडलेला लांन्स नाईक बहादूर क्षीण आवाजात एकेक शब्द बोलत होता. त्यावेळी डॉक्टरांचे उपचार चालूच होते. अधूनमधून वेदनांनी तो तोंड वेडेवाकडे करीत होता.

शरीरात घुसलेल्या गोळ्या काढण्यासाठी जेव्हा त्याला ऑपरेशनला थिएटरमध्ये नेण्यासाठी उचलले गेले तेव्हा कर्नल इस्माईल भारावलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहत होते... नेमके काय घडले असावे हे त्यांना समजत नव्हते.

रक्ताचा पाऊस... सापडलेले मानवी हाडामासांचे तुकडे त्यांच्या डोक्यात थैमान घालीत होते.

+++



# २

कॅप्टन दीप, लेफ्टनंट शेख आणि मारिया लोबो या तीन व्यक्ती मुजताघ या आर्मी हेडक्वार्टरमध्ये गंभीर चेहरे करून एकमेकांकडे पाहत होते. तीच अवस्था झाली होती. शेजारी बसलेल्या मेजर सारंगची.

समोरच एक फाईल उघड्या अवस्थेत पडली होती. थंडीचा कडाका मी म्हणत होता. चारही बाजूला चार शेगड्या पेटत होत्या इन्स्पेक्शन बंगल्याच्या त्या छोट्याशा हॉलमध्ये उष्णता निर्माण करायला त्या शेगड्या पुरेशा होत्या.

रक्ताचा पाऊस ही घटना पहिलीच असेल अशीच मेजर सारंगने स्वतःच्याच कल्पनेला तडा पाडला होता.

ही घटलेली घटना तिसरी होती.

यापूर्वीची घटना होती मारपोला या भागात. आणि दुसरी घडली होती याच भागाच्या पश्चिमेला साधारण पंधरा ते वीस मैलांवर.

कॅप्टन दीपला आणि त्याच्या खात्याला हे फार मोठे आव्हान होते. कल्पनेत न बसणाऱ्या घटना सत्यसृष्टीत कॅप्टन दीपवर सोपविण्यात आले होते.

सबंध दिवसभर ते धावपळीत होते. ज्या ठिकाणी रक्ताचा पाऊस पडला होता. त्याठिकाणी हेलिकॉप्टरने त्यांना उतरविण्यात आले होते. जवळजवळ तासभर ते जागेचा शोध घेत होते. पण त्या तासाभरात त्यांची कोणतीही प्रगती झाली नव्हती. हे सारे घडले कसे त्याचा विचार देखील ते